बीड । रविवार
१३.०७.२०२५
वर्षे : ५ अंक : १०३
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 




# विधानसभेत गेवराईचे आ. विजयराजे पंडित गरजले !

## गढी येथे मृत्यूमुखी पडलेल्या तरुणांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत कधी ! राष्ट्रीय महामार्गावर ५०० लोकांचा मृत्यू; प्रशासन आणखीन किती मृत्यूंची वाट पाहणार



• गेवराई शहराला जोडणाऱ्या दोन्ही बाजूच्या ब्लॅक स्पॉटवर उड्डाणपूल कधी होणार? अग्रवाल गुत्तेदारावर कारवाई करा ; राष्ट्रीय महामार्गाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक कधी होणार

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई येथून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ६१ व ५२ या महामार्गावर तब्बल अपघातामध्ये ५०० लोकांनी आपला जीव गमावला आहे. हे राष्ट्रीय महामार्ग मृत्यूचे सापळे बनले आहे. याकडे बीड जिल्ह्यातील प्रशासकीय अधिकारी लक्ष देत नसल्याने विधानसभेत प्रशासनाच्या निष्काळजीपणा विरोधात आमदार विजयसिंह पंडित आक्रमक झाले. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना या संदर्भात थेट प्रश्न विचारून बीड जिल्ह्यातील गेवराई येथील राष्ट्रीय महामार्गावरील समस्यांचे निराकरण कसे होणार याकडे शासनाचे लक्ष वेधले. विशेष म्हणजे काही दिवसापूर्वी गडी येथे सहा तरुणांचा अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता. गेवराई तहसील येथून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी प्रस्ताव मुंबई मंत्रालयात पाठवले आहेत यासाठी प्रशासन तातडीने या अपघातग्रस्त कुटुंबांना मदत करणार आहे का असाही प्रश्न आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत उपस्थित केला

पावसाळी अधिवेशनात प्रश्न उत्तरेच्या काळात गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी गेवराईच्या राष्ट्रीय महामार्गावरील अपघाताकडे शासनाचे लक्ष वेधले. गेवराई येथून राष्ट्रीय महामार्ग ५२ व ६१ जातात या महामार्गावर आतापर्यंत ५०० लोकांनी जीव गमावला आहे याकडे प्रशासन लक्ष देत नसल्याची खंत आमदार विजयसिंह पंडित यांनी बोलून दाखवली. सर्वोच्च न्यायालयाने ही गेवराई येथील अपघात प्रकरणाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. बीड जिल्हाधिकारी यांच्याकडे आपण वेळोवेळी निवेदन दिली आहे मात्र याकडे जिल्हाधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले असल्याचा आरोपही आमदार विजयसिंह पंडित यांनी केला. आतापर्यंत चार स्मरणपत्र जिल्हाधिकाऱ्यांना दिले मात्र याकडे जिल्हाधिकाऱ्यांनी गांभीर्यतीने पाहत नसल्याने प्रशासन किती निगरगट्ट झाले आहे. गेवराई शहराला दोन ब्लॅक स्पॉट आहेत या ब्लॅक स्पॉटवर उड्डाणपूल करण्यासाठी अग्रवाल नामक गुत्तेदाराला कॉन्ट्रॅक्ट देण्यात आला आहे मात्र अद्यापही या गुत्तेदाराने याकडे लक्ष दिले नसल्याने शासन त्याच्यावर कारवाई करणार का असा प्रश्न उपस्थित करत गेवराई महामार्ग राष्ट्रीय व नॅशनल हायवे असे दोन महामार्ग गेवराई येथील जातात. गेवराई महामार्गावर गडी येथे सहा तरुणांचा दुर्दैवी अपघातात मृत्यू झाला या प्रत्येक तरुणाच्या पाठीमागे पत्नी व लहान मुले आहेत या गंभीर अपघाताकडे प्रशासन लक्ष देणार आहे का. तहसीलदार यांच्याकडून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी प्रस्ताव पाठवण्यात आलेला आहे. अपघातात मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबीयांना शासन मदत कधी करणार याकडेही आमदार विजयसिंह पंडित ▶▶ उर्वरित पान २ वर

# अपहरण झालेल्या सालगड्याला वाचवण्यासाठी गेलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना ऊसतोड मुकादम आणि गुंडाकडून बेदम मारहाण

## मारहाणीत सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट गंभीर जखमी ; जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु

**बीड । प्रतिनिधी**

बाराशे रुपयासाठी ऊसतोड कामगाराचे मुकादमाने अपहरण केल्याची माहिती मिळताच सालगड्याला वाचवण्यासाठी गेलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना ऊसतोड मुकादम आणि त्याच्या साथीदारानीन बेदम मारहाण केल्याची घटना काल शुक्रवार दिनांक ११ रोजी माजलगाव तालुक्यातील लऊळ गावात घडली. या घटनेमध्ये सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी राजाराम सिरसट यांनी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली असुन याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या घटनेने जिल्ह्यामध्ये एकच खळबळ उडाली.

याबाबत अधिक माहिती अशी की माजलगाव तालुक्यातील किट्टीआडगाव येथील रहिवासी असलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांच्याकडे शेतात काम करण्यासाठी असणारा शेतगडी विश्वनाथ पंडित यांच्याकडे ऊसतोड मुकादम शेख राजू शेख बाबू रा. मंजरथ ता. माजलगाव जि.बीड याचे बाराशे रुपये देणे होते. या बाराशे रुपयांसाठी या मुकादमाने व त्याच्या साथीदारांनी शेतगडी विश्वनाथ पंडित यांचे शुक्रवार दिनांक ११ रोजी सकाळी दहा वाजता अपहरण केले. त्यानंतर त्याला मारहाण करायला सुरुवात केली. त्याने स्वतःचा बचाव करण्यासाठी शेत मालक सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना फोन करून मारहाण होत असल्याची माहिती दिली. सदर प्रकरणाची माहिती मिळताच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांनी संबंधित मुकादमा कडे फोनवरून शेतगड्याकडील पैशासंदर्भात विचारले असता मुकादमाने शेतगडी विश्वनाथ पंडित यांच्याकडे दीड लाख रुपये आहेत. दीड लाख रुपये द्या आणि शेतगड्याला घेऊन जा असे सांगितले. त्यामुळे राजाराम सिरसट यांनी दीड लाख रुपये दिल्यास तुम्ही माझ्या शेतगड्याला सोडणार का? असे विचारताच त्यांनी पैसे घेऊन या त्याला सोडतो असे सांगितले. त्यानंतर राजाराम ▶▶ उर्वरित पान २ वर



माजलगाव तालुक्यातील निपाणी टाकळी येथे...

# उपसरपंच चव्हाण यांना जीवे मारण्याचा प्रयत्न !

• मारहाणीचा बनवला व्हिडिओ ; गुंडांची दहशत कायम
• जिल्हा रुग्णालयात दाखल; गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु !

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गुंडांची व माफियांची दहशत कमी होण्याचे नाव घेत नसून वेगवेगळ्या घटनांनी बीड जिल्हा राज्यात नव्हे तर देशात बदनाम झाला आहे. गुंडांना थेट तडीपार व मोक्को अंतर्गत पोलीस विभाग कारवाई करत असतानाही गुंड कोणालाच घाबरत नसल्याचे दिसून येत आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीड जिल्हा हा अति संवेदनशील म्हणून राज्यात गणला जात आहे. एकापाठोपाठ एक आशा घटनांनी जिल्ह्यातील सुज्ञ नागरिक चिंता व्यक्त करत आहेत. यातच माजलगाव तालुक्यातील निपाणी टाकळी



गावात उपसरपंच लक्ष्मण चव्हाण यांना टोळक्याने अमानुषपणे मारहाण केली आहे.सरपंच संतोष देशमुख ▶▶ उर्वरित पान २ वर

# रेल्वेत नोकरी लावून देतो म्हणून तब्बल २४ लाखांची फसवणूक; मुंबईत जॉईनिंगसाठी आल्यावर धक्कादायक प्रकार उघड

**बीड । प्रतिनिधी**

रेल्वे खात्यात नोकरी लावतो म्हणून नियुक्तीपत्र, ट्रेनिंग, मेडिकल अशी सर्व प्रक्रिया पार पडल्याचे भासवत परळी येथील २१ वर्षीय महादेव भरत मुंडे या युवकाची तब्बल २४ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी संभाजीनगर परळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, महादेव मुंडे यांचे शिक्षण सुरू असून ते कुटुंबासमवेत पंचशीलनगर, परळी येथे राहतात.

नोव्हेंबर २०२३ मध्ये त्यांच्या वडिलांचे ओळखीचे असलेले काशीनाथ भानुदास घुगे (रा. शिवाजीनगर, परळी) यांनी त्याला रेल्वे खात्यात नोकरी लावतो असे सांगून विश्वासात घेतले, ५ डिसेंबर २०२३ रोजी ते महादेवला दिल्लीला घेऊन गेले व तेथे त्याचे मेडिकल करण्यात आले. यानंतर, सचिन नारायण वंजारे (रा. परळी) यांच्या खात्यावर दोन दिवसात एकूण १ लाख रुपये पाठविण्यात आले. त्याच्या मोबदल्यात महादेवला रेल्वेच्या गेटमन पदाचे बनावट नियुक्तीपत्र दिले गेले. पुढे अमृतसर येथे जाऊन ट्रेनिंगची प्रक्रिया सुरू झाली. परंतु नंतर, रेल्वे क्वार्टर मिळवण्यासाठी आणखी ३ लाख रुपये ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'वैद्यनाथ बँकेच्या संचालकपदी प्रितमताई बिनविरोध

• डॉ. मुंडेंवर जिल्ह्यासह संपुर्ण महाराष्ट्रातून शुभेच्छांचा वर्षाव
• परळी वैजनाथ दिया बँकेच्या निवडणुकीसाठी 71 नामनिर्देशन अर्ज दाखल



**परळी वै. । प्रतिनिधी**

दि. वैद्यनाथ अर्बन को- ऑपरेटिव्ह बँक लि., परळी वैजनाथच्या संचालक मंडळ निवडणुकीची प्रक्रिया सध्या सुरु आहे. बँकेच्या संचालक मंडळाच्या १७ जागांसाठी ही निवडणूक प्रक्रिया होत आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी काल (दि. ११) अखेरचा दिवस होता. या निवडणुकीसाठी एकूण ७१ नाम निर्देशन अर्ज दाखल झाले आहेत. विशेष म्हणजे बीड जिल्ह्याच्या माजी खा. डॉ. प्रीतमताई मुंडे यांची या बँकेच्या संचालकीपदी बिनविरोध निवड झाली आहे. याबद्दल डॉ. मुंडेंचे संपुर्ण बीड जिल्ह्यातून अभिनंदन केले जात आहे. स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी वैद्यनाथ बँकेचे रोपटे लावले आज ते मोठे वटवृक्षच झाले आहे.

**• तुम्हा सर्वांचे प्रेम आणि आशिर्वाद हेच आमच ध्येय – डॉ. प्रीतमताई**

**पंकजाताईंच्या नेतृत्वात वैद्यनाथ बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीत माझी बिनविरोध निवड झाल्याबद्दल आपण सर्वजण अभिनंदन करत आहात त्याबद्दल सर्वांचे खुप खुप आभार. आपल्या शुभेच्छा आणि आशिर्वाद हाच आमच्या उर्जेचा शाश्वत स्त्रोत आहे. बळ देणाऱ्या आपलुकीसाठी आभार व्यक्त करताना सर्वांनी संवाद साधने शक्य नाही. आपल्या शुभेच्छांचा ओघ नेहमीप्रमाणे अभूतपूर्व आहे. तुम्हा सर्वांचे प्रेम आणि आशिर्वाद हेच आमच ध्येय आहे. पुढील काळातही हा स्नेह असाच राहून दिवसेंदिवस वृध्दिंगत व्हावा, अशी प्रार्थना करते, सर्वांचे पुनःश्च आभार असे डॉ. प्रीतमताईंनी आपल्या पोष्टमध्ये म्हटले आहे.**

# फुले पिंपळगावच्या दलितांची जमीन हडप करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा; अनु.जाती आयोगाचीजिपोअला नोटीस

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील फुले पिंपळगाव शिवारातील गटनं.-२०मध्ये असणाऱ्या दलितांची जमीनील ५३आर एवढी जमीनीवर अकृषिक परवाना घेऊन सुनील तौर,के. एन.परळीकर, भुमि अभिलेख उपअधीक्षक, माजलगाव,एस. एन.गायकवाड, मोजणी अधिकारी भुमिअभिलेख, माजलगाव,किसन भानुदास जाधव सह तत्कालीन तहसीलदार, माजलगाव, राणोजी भागुजी जोगदंड,मंडळाधिकारी केसापुरी या सर्वांनी माजलगावचे माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांच्या संगनमताने कटकारस्थान केल्याच्या तक्रारी पोनि माजलगाव शहर व जिल्हापोलिस अधीक्षक यांच्या कडे करून उपरोक्त व्यक्तीं विरोधात गुन्हे दाखल करण्याची मागणी केली होती.

▶▶ उर्वरित पान २ वर




# राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त अंबाजोगाई शहरात सेवा सप्ताहाचे आयोजन

## राजकिशोर मोदी व राजेश्वर चव्हाण यांच्या पुढाकाराने 15 ते 22 जुलै दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष ना अजितदादा पवार तसेच राज्याचे माजी कृषीमंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी तसेच जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर चव्हाण यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने अंबाजोगाई शहरात १५ जुलै ते २२ जुलै २०२५ या कालावधीत सेवा सप्ताहाचे भव्य असे आयोजन करण्यात आले आहे. हा सेवा सप्ताह राज्याचे उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार व माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त साजरा करण्यात येणार असून सात दिवस सात उपक्रम या संकल्पनेवर आधारित सामाजिक कार्यक्रमांची मालिका राबवण्यात येणार आहे. राजकिशोर मोदी व राजेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या सप्ताहात आरोग्य, पर्यावरण, स्वच्छता, शिक्षण व जनजागृती यांसारख्या विविध विषयावर आधारित हे समाजोपयोगी उपक्रम राबवले जाणार आहेत. समाजातील प्रत्येक घटकाला स्पर्श करणाऱ्या या उपक्रमांमुळे अंबाजोगाईमध्ये सेवाभावाची सकारात्मक अशी लाट निर्माण होणार आहे. रक्तदान शिबिराने सेवा सप्ताहाचा शुभारंभ

मंगळवार १५ जुलै रोजी युवा वर्गामध्ये समाजसेवेची जाणीव निर्माण व्हावी, तसेच गरजूं रुग्णांना तातडीने रक्त उपलब्ध व्हावे या उद्देशाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करून या सप्ताहाचा शुभारंभ होणार आहे . या रक्तदान शिबिरात अनेक तरुण स्वयंसेवक सहभाग नोंदवणार आहेत. बुधवार दि १६ रोजी पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या उद्देशाने वृक्षारोपण मोहीम राबवली जाणार असून यात सार्वजनिक जागांमध्ये व शासकीय परिसरात विविध प्रकारची झाडे लावण्यात येणार आहेत.

गुरुवार दि १७ रोजी अंबाजोगाई बसस्थानक परिसरात स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे. शहराच्या स्वच्छता व सौंदर्यात भर घालणाऱ्या या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन मोदी व चव्हाण यांनी केले आहे. शुक्रवार दि १८ जुलै रोजी गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. यासाठी शहरातील शाळा व संस्थांशी समन्वय साधून तेथील ▶▶ उर्वरित पान २ वर



# सातत्य, एकाग्रता आणि समर्पण ही यशाची त्रिसूत्री: राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

## देशाच्या स्वावलंबन व सामरिक सज्जतेच्या वाटचालीत विद्यार्थ्यांनी योगदान द्यावे

**नागपूर**

भारत आज जागतिक स्तरावर सर्वच क्षेत्रात अग्रेसर असणारा देश म्हणून पुढे येत आहे. विशेषतः संरक्षण क्षेत्रात देशाची वाटचाल स्वावलंबनाकडे सुरू आहे. स्वावलंबन व सामरिक सज्जतेकडे वाटचाल करत असलेल्या देशाच्या प्रवासात 'एनएडीपी'तून उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी योगदान देत सातत्य, एकाग्रता आणि समर्पण ही यशाची त्रिसूत्री अंगीकारावी, असे आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज येथे केले.



राष्ट्रीय संरक्षण उत्पादन अकादमीत पदव्युत्तर व्यवस्थापन पदविकेच्या पहिल्या दीक्षान्त समारंभात ते बोलत होते. यावेळी मा. राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, म्युनिशन्स इंडिया लिमिटेड संजय हजारी, मुख्य संचालक, राष्ट्रीय संरक्षण उत्पादन अकादमी डॉ. जे. पी. दास, संचालक (मानव संसाधन), म्युनिशन्स इंडिया लिमिटेड जे. पी. नाईक यांच्यासह संरक्षण क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते. राष्ट्रीय संरक्षण उत्पादन अकादमीमध्ये व्यवस्थापन पदव्युत्तर पदविका (PGDM) च्या पहिल्या बॅचच्या दीक्षान्त समारंभाला उपस्थित असल्याचा आनंद असल्याचे सांगून राज्यपाल पुढे म्हणाले की, केवळ पदवीप्राप्त विद्यार्थ्यांसाठीच नव्हे, तर आपल्या संपूर्ण राष्ट्रासाठी ही एक मैलाचा दगड ठरणारी घटना आहे. देशाच्या संरक्षण क्षेत्रातील परिवर्तनाच्या प्रवासात या अकादमीतून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे. ही अकादमी भविष्यात भारतातील संरक्षण उत्पादन व्यवस्थापन क्षेत्रातील एक उत्कृष्ट विद्यार्थी केंद्र बनणार असून त्याचा पाया आज घातला गेला असल्याचे राज्यपाल यावेळी म्हणाले. राज्यपाल पुढे म्हणाले की, संरक्षण साधने विदेशातून आयात करावी लागायची. परदेशावर अवलंबून राहावे लागायचे. आता मात्र संरक्षण क्षेत्रात स्वावलंबनासह संशोधन व आधुनिकीकरण पाहायला मिळत आहे. सध्याचे युद्ध हे मनुष्यापुरते मर्यादित राहणार नसून तंत्रज्ञानावर आधारित राहणार आहे. तंत्रज्ञानाचे महत्त्व लक्षात घेता आपल्याला उच्च दर्जाचे संरक्षण तंत्रज्ञान गरजेचे आहे. या अकादमीच्या माध्यमातून हे तंत्रज्ञान अवगत होणार आहे. संरक्षण क्षेत्र हे आता सर्वांसाठी खुले झाले आहे. त्यामुळे पुढे जाण्याच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध असल्याचे असल्याचे राज्यपाल यावेळी म्हणाले.

# निर्भीड पत्रकार नवनाथ आडे लोकशाहीचा खरा रक्षक..!

## लेखणीच्या जोरावर सत्तेला हादरवणारा निर्भीड लेखणीचा बादशाह!

**तलवाडा/शेख आतिख**

पत्रकारिता ही समाजाच्या आरश्यासारखी असते. ती समाजात घडणाऱ्या घटनांचे, समस्यांचे आणि सत्तेच्या कार्यपद्धतीचे सत्य प्रतिबिंब जनतेसमोर आणते. परंतु या आरशामध्ये सत्य दाखवण्याचे धाडस दाखवणारा निर्भीड पत्रकार म्हणजे नवनाथ आडे यांच्याकडे पाहिले जाते. त्याच्या लेखणीत भीती नसते, दबाव नसतो, फक्त आणि फक्त सत्य असतं. ते कडवट असो वा कडू, निर्भीड पत्रकार नवनाथ आडे हे कोणत्याही राजकीय, सामाजिक, किंवा आर्थिक दबावाला बळी न पडता सत्य मांडण्याचे काम करतात. त्याला माहिती असते की, आपले शब्द काहींच्या जीवाला घातक ठरू शकतात, पण तरीही ते थांबत नाही. कारण त्याचा उद्देश जनतेला खरी माहिती पुरवणे हा असतो. अशा निर्भीड पत्रकारांच्या बातम्या केवळ मथळे देत नाहीत, तर समाजाला जागं करतात. आजच्या धकाधकीच्या आणि माहितीच्या महापुरात सत्य कुठे हरवत चालले आहे. अशा वेळी निर्भीड पत्रकार नवनाथ आडे हे सत्य शोधून, त्याला आवाज देतात. ते समाजासाठी दीपस्तंभासारखे असतात. अंधारात प्रकाश दाखवतात. त्यामुळे अशा पत्रकारांचा आदर करणे, त्यांचे संरक्षण करणे आणि त्यांना पाठिंबा देणे ही प्रत्येक जागरूक नागरिकाची



जबाबदारी आहे. निर्भीड पत्रकाराच्या वाटेवर अनेक काटे असतात. धमक्या, खोट्या आरोपांखाली गुंतवणे, सामाजिक बहिष्कार, आर्थिक अडचणी या सगळ्या गोष्टींना सामोरं जात तो आपलं काम करत राहतो. काही वेळा या संघर्षात त्याला आपला जीवही गमवावा लागतो. पण अशाही परिस्थितीत तो स्वतः ला झुकू देत नाही. नवनाथ हाडे हे नाव आज पत्रकारितेच्या क्षेत्रात निर्भीडतेचे प्रतीक बनले आहे. सत्ता, प्रशासन आणि गुन्हेगारी यांच्यातील साठगाठ उघड करणाऱ्या त्यांच्या बातम्या समाजात खळबळ उडवणाऱ्या ठरल्या आहेत. कोणतीही भीती न बाळगता लोकांच्या प्रश्नासाठी संघर्ष करणारा पत्रकार म्हणून त्यांची ओळख तयार झाली आहे. नवनाथ आडे

### ● नवनाथ आडे : सत्यासाठी लढणारा निर्भीड लेखणीचा योद्धा!

**निर्भीड पत्रकार हा लोकशाहीचा चौथास्तंभ अधिक मजबूत करतो. अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार तसेच चुकीच्या कृत्यांवर प्रश्न विचारणं, भ्रष्टाचार उघड करणं, शोषितांची बाजू मांडणं ही नवनाथ आडे यांची खरी ताकद आहे. अशा पत्रकारांमुळेच लोकशाही टिकून राहते आणि सत्ता अधिक जबाबदारीने वागत असते.**

यांनी अनेक घोटाळ्यांवर प्रकाश टाकला असून, भ्रष्टाचार सामाजिक अन्याय, दलाली आणि प्रशासनातील हलगर्जीपणा यावर त्यांनी वेळोवेळी आवाज उठवला आहे. त्यांच्या लिखाणामुळे अनेक प्रकरणे उजेडात आली आहेत आणि संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले गेले आहे. त्यांच्या पत्रकारितेमुळे अनेकांना न्याय मिळाला आहे आणि नागरिकांमध्ये जागरूक निर्माण झाली आहे. त्यांच्या कार्यामुळे लोकशाहीचा चौथास्तंभ म्हणून ओळखली जाणारी पत्रकारिता अधिक मजबूत होत आहे.

पान १ वरून पुढे...

## विधानसभेत गेवराईचे...

यांनी लक्ष वेधले. बीड जिल्ह्यातील प्रशासन निगरगट्ट व संवेदनाहीन झाले असून गेवराई शहरात जाणारे दोन्ही ब्लॅक स्पॉट अपघाताचे केंद्र ठरत आहेत या दोन्ही महामार्गावर उड्डाणपुलाची आवश्यकता असून प्रशासन व शासन याकडे कधी लक्ष देणार पावसाळी अधिवेशनात गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित हे आक्रमक झाले असून ज्या जिल्हा परिषद सर्कल मधून ते सदस्य होते त्या परिसराचे रस्त्यांची समस्या ही आमदार विजयसिंह पंडित यांनी मांडली. गेवराई राष्ट्रीय महामार्गावरील अपघाताची मालिका कमी करण्यासाठी प्रशासन लक्ष देणार आहे का प्रशासन या संदर्भात काय कारवाई करणार याकडे आमदार विजयसिंह पंडित यांनी लक्ष वेधले.

## अपहरण झालेल्या...

सिरसट यांनी घरी जाऊन दीड लाख रुपये घेतले व मुकादमाने सांगितलेल्या ठिकाणी गेले. यावेळी शेत गड्याने दीड लाख रुपये

देऊ नका असे सांगितले. त्यामुळे मुकादम शेख राजू शेख बाबू आणि त्याच्या साथीदारानी शेत गड्यासह शेत मालक सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली. दरम्यान लाठ्या-काठ्या, कु-हाड आणि गुप्ती अशी धारदार शस्त्रे घेऊन झाडीमध्ये लपून बसलेल्या दहा-बारा जणांनी बाहेर येत शेतगडी आणि शेतमालक राजाराम सिरसट यांना मारहाण करायला सुरुवात केली. यावेळी मुकादमाने त्याच्या जवळ असलेल्या रिव्हॉल्वरचा धाक दाखवून पुन्हा मारहाण करायला सुरुवात केली असता पोलीस खात्यातील कैशल्याचा वापर करून राजाराम सिरसट यांनी शिताफिने मुकादमा जवळील रिव्हॉल्वरचा ताबा घेतला. परंतु सदर रिव्हॉल्वर मध्ये बुलेट नाहीत हे मुकादम आणि त्याच्या साथीदारांना माहित असल्यामुळे आपल्याला काही धोका नाही हे सर्वांना ज्ञात होते. त्यामुळे सर्वांनी असुरी हसत पुन्हा जबर मारहाण करायला सुरुवात केली. या मारहाणीत सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट गंभीर जखमी झाले.

या गंभीर जखमी अवस्थेत राजाराम सिरसट यांना जबरदस्ती मोटरसायकलवर बसवून माजलगाव तालुक्यातील ढोरगाव आणि लवूळ शिवारातील घनदाट असलेल्या जंगलात घेऊन जाऊन पुन्हा मारहाण करायला सुरुवात केली. यावेळी सदरील मुकादम आणि त्याच्या साथीदारांनी राजाराम सिरसट यांच्या जवळील दीड लाख रुपये हिसकावून घेत बेदम मारहाण केली. या मारहाणी मध्ये राजाराम सिरसट यांच्या घशाला कोरड पडल्यामुळे त्यांनी मुकादम आणि मारहाण करणाऱ्यांकडे मला मारू नका, मी मरेन, मला पाणी द्या अशी विनंती करून पिण्यासाठी पाणी मागितले असता या गुंडांनी त्यांच्या तोंडावर लघुशंका केली. यावर हे लोक थांबले नाहीत यांनी त्यांच्या कानात नको ती कृती करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान आपल्या साहेबासोबत अमानुष कृत्य करत आहेत आणि बेदम मारहाण करत आहेत हे पाहून घाबरलेला शेतगडी त्या ठिकाणाहून पळून गेले व त्यांनी राजाराम सिरसट यांच्या मुलाला फोन करून मुकादम आणि त्याचे साथीदार जबर मारहाण करत आहेत. तुम्ही ताबडतोब या असे फोन द्वारे सांगितले. आपल्या वडिलांना मारहाण होत असल्याचे समजताच राजाराम सिरसट यांचा मुलगा विजयकुमार सिरसट यांनी वडीलांना फोनवरून संपर्क साधला असता मुकादम व त्याच्या साथीदारांनी राजाराम सिरसट यांना कोणाचा फोन आहे असे म्हणत फोन उचलण्यासाठी सांगितले. त्यावेळी राजाराम सिरसट यांनी आपल्या मुलाला फोनवरून मला लऊळ गावातील सैलानी बाबा परिसरात मुकादम आणि त्याचे काही साथीदार मारहाण करत आहेत ताबडतोब ये असं निरोप दिला. आपल्या वडिलांना मारहाण होत असल्याने विजयकुमार सिरसट मित्रांना घेऊन वडिलांना वाचवण्यासाठी घटनास्थळी पोहोचले. यावेळी राजाराम सिरसट यांचा मुलगा आणि त्याचे मित्र येत असल्याचे पाहून मुकादम व त्याच्या गुंडांनी गंभीर जखमी झालेल्या राजाराम सिरसट यांना पुन्हा गाडीवर बसवून घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी रस्त्यावर चिखल असल्याने मोटारसायकल चिखलात स्लिप झाली व मोटारसायकलवरील तिघे खाली पडले. त्यावेळी राजाराम सिरसट यांचा मुलगा व त्याचे मित्र घटनास्थळी येताच मारहाण करणारे गुंड पळून गेले. दरम्यान या वेळी मारहाण करणाऱ्या मुकादमाला विजयकुमार सिरसट यांच्या मित्रांनी पकडून माजलगाव पोलीस ठाण्यात आणले. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांनी मारहाण करणाऱ्या मुकादम आणि त्याच्या साथीदाराच्या विरोधात तक्रार दिली असून आज शनिवार दिनांक १२ रोजी सायंकाळी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या मारहाणीत राजाराम सिरसट हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर बीड येथील जिल्हा रुग्णालय उपचार सुरू आहेत. किरकोळ पैशासाठी मुकादम आणि त्याच्या साथीदारांकडून सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्यांना अमानुष आणि गंभीर मारहाण होते हे बाब अतिशय गंभीर आणि अमानवी आहे. या घटनेने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली.

## माजलगाव तालुक्यातील..

हत्या प्रकरणामुळे बीडचा बिहार झाल्याचा गुन्हेगारीचा भेसूर चेहरा समोर आला. पण, या प्रकरणानंतरही बीडमध्ये गुन्हेगारी काही कमी झाली नाही. खून आणि मारहाणीच्या घटना सुरूच आहे. अशातच माजलगाव तालुक्यातील उपसरपंचाला रस्त्यावर अडवून गुंडांनी लोखंडी पाईप, कोयत्या आणि दगडाने अमानुषपणे मारहाण केली. या घटनेना व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, बीडच्या माजलगाव तालुक्यातील निपाणी टाकळी गावात ही घटना घडली आहे. उपसरपंच लक्ष्मण चव्हाण यांना टोळक्याने अमानुषपणे मारहाण केली आहे. ही घटना शुक्रवारी संध्याकाळी घडल्याची माहिती आता समोर आली आहे. लक्ष्मण चव्हाण यांनी ग्रामसभेमध्ये चुकीच्या कामाबद्दल प्रश्न उपस्थितीत केला होता. याचा राग धरून गावातील ग्राम सभेत चुकीच्या कामाला विरोध केला म्हणून सरपंच पती आणि चार ते पाच जणांच्या टोळक्याकडून चव्हाण यांना मारहाण करण्यात आली. लक्ष्मण चव्हाण आणि त्यांचा साथीदार हे दोघे राष्ट्रीय महामार्ग २२२ वरून पाच वाजेच्या सुमारास गावाकडे जात होते. यावेळी काही गुंड हे त्यांचा पाठलाग करत होते. महामार्गावर या गावगुंडांनी गाडी अडवली आणि चव्हाण यांना बेदम मारहाण सुरू केली. चव्हाण यांना लोखंडी रॉड, लाकडी दांड्याने मारहाण करण्यात आली. या मारहाणीत त्यांच्या कानाचा पडदा फाटला, हाता पायाला फ्रॅक्चर आले आहे. त्यांच्यावर बीड जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच माजलगाव ग्रामीण पोलिसांनी चव्हाण यांचा जबाब नोंदवला. त्यानुसार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

पाठलाग करून बेदम मारहाण ; व्हिडिओ रेकॉर्डिंग ! या टोळक्याने चव्हाण यांचा पाठलाग करून महामार्गावर अडवलं होतं. काही तरुण हे दुचाकीवरून पाठलाग करत होते, तर काही जण हे चारचाकी कारमध्ये होते. चव्हाण येताना दिसले तसे सगळे धावून आले आणि महामार्गावरच त्यांना मारहाण सुरू केली. या टोळक्यातील एकाने मारहाण करताना व्हिडिओ रेकॉर्ड केला. या व्हिडिओच्या माध्यमातून दहशत निर्माण करण्याचा आरोपींचा प्रयत्न असल्याचा आरोप चव्हाण यांनी केला आहे. गंभीर जखमी लक्ष्मण चव्हाण यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे.

## रेल्वेत नोकरी...

मागण्यात आले. महादेवच्या वडिलांनी आपल्या खात्यातून ९० हजार रुपये काशीनाथ यांना पाठवले. अमृतसर येथे सुरजसिंह नावाच्या इसमाशी संपर्क करून गेट क्र. २६ वर ट्रेनिंग सुरू झाली. पुढील टप्प्यात महादेवकडून संजय ठाकूर, मनिष यादव, एस. के. सिंग या व्यक्तींनी वेळोवेळी संपर्क करून ५० हजार ते ६ लाखांपर्यंतची रक्कम मागून घेतली. या शिवाय, महादेवच्या मामाकडून आणि आजोबांकडून त्याच्या चुलत मामासाठी टीसी पदावर नोकरी लावण्यासाठी तब्बल १४,७०,००० रुपये उकळण्यात आले.यातून काही रक्कम स्वतः महादेवच्या खात्यातून व वडिलांच्या खात्यातून प्रेमकुमार यांच्या खात्यावर पाठवली. अशी तब्बल २४ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. महादेवचे चुलत मामा दिल्लीतून मिळालेली नियुक्तीपत्र घेऊन मुंबई उडढच् येथे ऊ्चठ ऑफिसमध्ये जॉईन होण्यासाठी गेले. मात्र, तेथील अधिकाऱ्यांनी ही ऑर्डर बनावट असल्याचे स्पष्ट केल्यानंतर सर्व प्रकाराची पोलखोल झाली. ज्यानंतर संपूर्ण कुटुंबाला मोठा धक्काच बसला. या सर्व प्रकारानंतर महादेव मुंडे यांनी संभाजीनगर, परळी वै. पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली असून काशीनाथ घुगे, सचिन वंजारे, संजय ठाकूर (रा.दिल्ली), सुरजकुमार सिंग (अमृतसर, पंजाब), या संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ कलम३ (५), भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ कलम ३४२(२),भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ कलम३४०(२),भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ कलम ३३६ (३), भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ कलम ३३६(२),भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ कलम ३१६(२), भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ कलम ३१८(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अनिल शिंदे हे करीत असल्याचे सांगण्यात येत आहे.

## फुले पिंपळगावच्या...

पण यात गुन्हे करण्यात आले नाही म्हणुन मुख्य तक्रारदार मनोज साळवे तथा नमुद गट नंबर मधील शेतकरी रा.फुलेपिंपळगाव यांनी अनुसूचित जाती आयोग महाराष्ट्र व गोवा,भारत सरकार कडे संबंधित सर्व दस्तऐवज सादर करून तक्रार केली होती यावर आयोगाने दखल घेऊन पोअ, बीड यांनी चौकशी करून गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते. यानंतर पोलीसांनी चौकशी करून फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तजवीज ठेवल्याचा अहवाल आयोगाकडे सादर केला होता पण यात हि पोलीसांनी शेख मंजूर व इतरांशी संगनमत करुन गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ करत प्रकरण दडपुन टाकले होते. हि बाब मनोज साळवे यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर ३०जून -२०२५रोजी फाईल संख्या एपीसीआर /आरपी/एमएच/२०२५/३००६२५ दिनांक ३०/०६/२०२५ च्या आयोगाने जिपोअ यांना नोटीस जारी करून भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३३८च्या अंतर्गत मिळालेल्या अधिकारात प्रकरणी चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणुन जिपोअ यांना नोटीस मिळाल्यानंतर ३०दिवसात नोटीस मध्ये दिलेल्या विहित नमुन्या प्रमाणे चौकशी करून अहवाल आयोगाकडे सादर करावा असे म्हटले आहे. सदर नोटीस मध्ये शेवटी नमुद केले आहे की,कृपया लक्षात घ्यावे की, आयोगाने दिलेल्या निर्धारीत कालावधीत काहिच उत्तर दिले नाही तर भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३३८नुसार आयोगाला मिळालेल्या अधिकारा प्रमाणे दिवाणी न्यायालया प्रमाणे पोलीस अधीक्षक यांनी अथवा त्यांच्या प्रतिनिधी यांना आयोगाच्या समोर हजर राहण्याचे समन्स बजावु शकते.

## राज्याचे उपमुख्यमंत्री...

शैक्षणिक मदत पोहोचवली जाणार आहे. शनिवार दि १९ जुलै रोजी प्लास्टिकमुक्त अंबाजोगाईसाठी जनजागृती मोहिम राबवण्यात येणार आहे. याद्वारे पर्यावरण पूरक जीवनशैलीचा अंगीकार करण्याचे संदेश या माध्यमातून समस्त नागरिकांस दिले जाणार आहे. दि २० रोजी श्री योगेश्वरी मंदिर परिसरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना मोफत महाप्रसादद्वारे अन्नदान करण्यात येणार आहे. सोमवार दि २२ जुलै रोजी तुमचं मत, माझं कर्तव्य ही नाविन्यपूर्ण अशी संकल्पना राबविण्यात येणार आहे. या संकल्पनेतून नागरिकांच्या गरजा, त्यांच्या तक्रारी व नागरिकांच्या प्रलंबित मागण्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी एक विशेष जनसंपर्क उपक्रम राबवला जाणार आहे. प्रत्येक वयोगटातील नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा आणि त्या मार्गी लावण्याचा प्रयत्न या उपक्रमाद्वारे केला जाणार आहे. या संपूर्ण सप्ताहात राजकिशोर मोदी (प्रदेश उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस) तसेच ऍड राजेश्वर चव्हाण (जिल्हाध्यक्ष रा का पार्टी ) यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली सेवा सप्ताह या अंतर्गत विविध विधायक उपक्रम यशस्वीपणे संपन्न होणार आहेत. त्यांच्या नेतृत्वात यापूर्वीही अनेक विविध सामाजिक , सांस्कृतिक तसेच शैक्षणिक उपक्रम यशस्वी पणे राबवण्यात आले असून याद्वारे शहर व परिसरात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

या सेवा सप्ताहाचे उद्दिष्ट केवळ कार्यक्रम राबवणे नसून येथील युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करणे, नागरिकांच्या गरजा समजून घेणे आणि पर्यावरणपुरक स्वच्छ, शिक्षित आणि आरोग्यदायी समाजनिर्मितीकडे वाटचाल करणे हे आहे. सेवा सप्ताहाच्या निमित्ताने अंबाजोगाई शहर व परिसरात लोकसहभागातून परिवर्तनाचा नवा अध्याय सुरू होण्यास प्रेरणा मिळणार आहे.

पान ४ वरून पुढे...

## स्थानिक स्वराज्य...

सचिव वैद्यनाथ राठोड हे या बैठकीला संबोधित करणार आहेत त्याचबरोबर पत्रकार परिषद घेऊन पुढील दिशा ठरविणार आहेत तरी सर्वांनी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष अशोक येडे यांनी केले आहे.

## नगरसेवक अमर...

अजित पवार यांच्याकडे माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली लेखी मागणी केली होती. त्यानंतर सदरील रस्त्याचा प्रश्न आज रोजी जिल्हा नियोजनमधून मार्गी लागला आहे, तसेच रस्त्याचे काम संपुर्ण झाले असून आज रोजी नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी सुरू असलेल्या कामास भेट दिली केले. यावेळी हनुमान नगर येथील रामदास सरवदे, निवृत्ती जगताप, कानडे तात्या, जालिंदर मुळे, भास्कर चांदणे, गोरख सरवदे, संतोष क्षीरसागर, संतोष चांदणे, महेश खूपसे, अशोक शिंदे, रवींद्र क्षीरसागर, पप्पू कांबळे, राहुल काळवणे, आकाश काळवणे, सचिन गालफाडे, पवन खूपसे, नितीन वीर, कांता दौंड, काळू कसबे, सखाराम वैगुंडे, प्रकाश अवसरमल यांची उपस्थिती होती. यावेळी स्थानिक नागरिकांनी नगरसेवक अमर नाईकवाडे यांचे आभार मानले.

## ज्येष्ठ नेते...

सामाजिक कार्याच्या मार्गावर चालत त्यांच्या कार्यकर्त्यांनी सामाजिक उपक्रम राबवून डॉ.बाबुरावजी जोगदंड यांचा वाढदिवस साजरा केला. मांजरसुंबा ससेवाडी ग्रामपंचायत सदस्य संदीप कदम, ज्येष्ठ नेते अच्युतराव रसाळ, राहुल कदम, संदीपान कदम, शिवानी चे माजी सरपंच रवी मुंजाळ, महाजनवाडी चे विलास घरत, विशाल शिंदे, बिभीषण डोईफोडे यांच्यासह अनेक शेकडो कार्यकर्त्यांनी या वाढदिवसानिमित्त रक्तदान केले. यावेळी माजी सरपंच बबन वाघमारे, संपादक समीर काझी, संपादक नितीन जोगदंड जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे, अभिजीत वैद्य, छाया सरवदे उपस्थित होते.

## आ. सुरेश धस...

तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवा यात मी कसलाही सहभाग घेणार नाही हे जाहीर करत पोलिसांनी योग्य तो तपास करावा अशी सुचनाही धस यांनी दिली. त्यानंतर अधिवेशन आटोपून ते आष्टीकडे येत असताना मयत नितीन शेळके यांच्या घरी जाऊन भेट झालेल्या दुर्दैव घटनेबद्दल खंत व्यक्त करत कुटुंबियांना धिर दिला.

## खरीप हंगामातील...

पावसाअभावी पिकांची वारंवार लागवड किंवा दुबार पेरणी करून देखील शंभर टक्के पिके उभारलेली नसून ७० टक्के ते ५० टक्के पिके ही पावसाळा उघलेली नाहीत यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. आभाळ भरून येत थोडा नकळतपणे भुरभुरा पाऊस पडतो आणि निघून जातो या आठवड्यातील तीन दिवस भरगच्च ढगे भरुन आले नकळत पाऊस झाला पण झाडाखाली जमीन कोरडीच होती

सरकारने तात्काळ शेतकऱ्यांना मोफत खत दुबार पेरणीसाठी त्वरित आर्थिक मदत कुठलाही पंचनामा कर न करता थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करून शेतकरी दुबार पेरणी साठी शासनाने सहकार्य करू शेतकऱ्याचे होणारे नुकसान टाळावे व जगाच्या पोशिंदा संकटातून बाहेर काढावे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात

### स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्याचा जिल्हा प्रशासनाकडून मिळणार कानमंत्र- अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक

### १४ तारखेला मार्गदर्शन शिबिर; दरमहा राबवण्यात येणार उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

सध्याच्या स्पर्धेच्या युगात स्पर्धा परीक्षा देण्याकडे युवांचा कल वाढलेला आहे. जिल्ह्यातील युवांना या परीक्षेचे योग्य मार्गदर्शन मिळावे. त्यांनी या स्पर्धा परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करावे, या हेतूने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या संकल्पनेतून दरमहा मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. यातून स्पर्धा परीक्षेतील यशाचा कानमंत्र जिल्ह्यातील युवांना मिळणार आहे. या उपक्रमाची सुरूवात सोमवार, १४ रोजी होत आहे. या शिबिराचा जिल्ह्यातील सर्व युवांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात दुपारी ३.३० वा. मार्गदर्शन शिबिरास सुरूवात होणार आहे. बीड येथील परिविक्षाधिन पोलिस उपअधीक्षक पूजा पवार, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी या पदावर नुकतेच निवड झालेले व सध्या बीड येथे तलाठी म्हणून कार्यरत असलेले क्रिश्रकुमार बाहेती शिबिरात मार्गदर्शन करणार आहेत. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांना अभ्यासाचे सुनियोजन, अभ्यास पद्धती, परीक्षेचे महत्त्व, यशाचा कानमंत्र, महाविद्यालयीन काळातच स्पर्धा परीक्षेकडे वळण्याची ओढ, यासाठी या शिबिराचा लाभ होईल. परीक्षेची तयारी कशी करावी, त्यासाठी पात्रता काय आदी बाबींसह परीक्षेतील यश मिळवण्याबाबत मार्गदर्शन मिळावे. स्पर्धा परीक्षेत बीड जिल्ह्यातील उमेदवारांचे यशाचे प्रमाण वाढावे, या हेतूने बीड जिल्हा प्रशासनाने हा उपक्रम हाती घेतला आहे. प्रत्येक विभागातील संधी, त्यासाठी होणाऱ्या परीक्षा, पात्रता, तयारी, अभ्यासाचे नियोजन, आदींबाबत जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांचे अधिकारी अनुभवाद्वारे उमेदवारांना मार्गदर्शन करणार असल्याचेही धार्मिक म्हणाले.

### सरपंच पदांचे तालुकानिहाय आरक्षणाचे वाटप जाहीर: उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी

**बीड । प्रतिनिधी**

शासन राजपत्र १३ जून २०२५ नुसार जिल्ह्यातील तालुकानिहाय सरपंच पदांचे आरक्षणाचे वाटप करण्यात आले आहे. शिवाय संबधित तहसील, ग्रामपंचायतीच्या सूचना फलकावर अधिसूचना प्रसिद्ध करण्याच्या सूचना उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी दिल्या आहेत. जिल्ह्यातील एक हजार ३५ ग्रामपंचायतींच्या आरक्षणाचे वाटप झाले आहे. त्यामध्ये अनुसूचित जातीसाठी १४० पैकी ७३, अनुसूचित जमातीसाठी १३ पैकी ८, मागास प्रवर्गासाठी २७९ पैकी १४२, खुला प्रवर्गासाठी ६०३ पैकी ३०४ महिलांसाठी आरक्षणाचे वाटप करण्यात आलेले आहे, तर १५ एप्रिल २०२५ च्या शासन राजपत्रान्वये जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील तलवडा ग्रामपंचायतीचे विभाजन होऊन पोईतांडा ग्रामपंचायती निर्मिती नव्याने झाली आहे, असेही श्री. सूर्यवंशी यांनी कळवले आहे.

### २० जुलै रोजी राज्यस्तीय रोल बॉल स्पर्धेसाठी जिल्हास्तरीय स्पर्धा व निवड चाचणीचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**




राज्यास्तरीय रोल बॉल स्पर्धेसाठी जिल्हास्तरीय स्पर्धा व जिल्हा संघाची निवड चाचणी होणार आहे. रविवार दिनांक २० जुलै २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता बीड जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे ही निवड चाचणी होणार असून स्केटिंगच्या सर्व इच्छुक खेळाडूंनी संपर्क करण्याबाबत कळविण्यात आले आहे. रोल बॉल असोसिएशन महाराष्ट्र व धाराशीव जिल्हा रोल बॉल संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने १५ वी मिनी राज्यस्तरीय रोल बॉल स्पर्धा दि.१६,१७ ऑगस्ट २०२५ रोजी (११ वर्षा खलील मुले/मुली ) ता.उमरगा, जि.धाराशिव येथे होणार आहे.११,१४ वर्षा आतील मुले/मुली यांची जिल्हास्तरीय निवड चाचणी २० जुलै २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल बीड येथे होणार आहे. चॅम्पियनशिप संघ प्रवेश शुल्क १ हजार रुपये प्रतिसंघ, खेळाडू नोंदणी शुल्क जिल्हा ३०० रु. प्रति खेळाडू, खेळाडू नोंदणी शुल्क तालुका ३०० रु. प्रति खेळाडू, निवड चाचणीसाठी येणार्या सर्व खेळाडूंनी आपले आधार कार्ड, बॉनफाईड तसेच स्केटिंग, गार्ड, जर्सी सुट, सर्व सुरक्षित साधने असणे बंधनकारक असतील. या निवड चाचणीमध्ये बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा असे आवाहन रोल बॉल छत्रपती संभाजीनगर विभागाचे प्रमुख तथा बीड जिल्हा रोल बॉल आसोसिएशनचे सचिव रामदास गिरी व जिल्हा संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी मो ९८८११५९६०७, वैभव गिरी मो ९०२८५९०४४८ यांच्याशी संपर्क साधावा.

### श्री नारायण मा. व उ.मा. विद्यालय येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये गुरु पोर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली .यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माननीय संस्थेचे अध्यक्ष श्री म हादेवराव काळे अण्णा, संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर उपस्थित होते. प्रथम मान्यवरांनी महर्षी व्यास यांच्या प्रतिमेचे पूजन केले. पुष्पहार अर्पण करून प्रतिमा पूजन झाले. विद्यार्थ्यांनी सुंदर असे भाषणे केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री चव्हाण युवराज यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.श्री धर्मराज पौळ यांनी केले,कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राध्यापक अशोक घरत सर यांनी केले. प्रा.श्री गणेश मस्के, श्री रकटे एन. पी ,सौ. भुतावळे बि. आर , श्री इनकर सर, कदम एस .व्ही, श्री पवार पी .एल, श्री रकटे बी. आर, श्री मुरमुडे ए .एन , करपे सर, शेख सर, श्री प्रा. मस्के मॅडम ,श्री चौधरी पी. बी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. यावेळी पालक, शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लक्ष्मीकांत दोडके दिग्दर्शीत 'रेंज पाहिजे' नाटकाच्या तालमीचा शुभारंभ

## बीड रंगभूमीवर ७० कलाकार साकारणार अद्भुत कालकृती!

**बीड । प्रतिनिधी**

अनेक वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर बीडच्या रंगभूमी नवचैतन्याचा श्वास घेणार आहे. लक्ष्मीकांत दोडके दिग्दर्शीत आणि सोनल नहार लिखित 'रेंज पाहिजे' या दोन अंकी नाटकाची निर्मिती करण्यात येत असून काल दि. ११ जुलै २०२५ रोजी सायंकाळच्या दरम्यान गुरुपौर्णिमेच्या मंगलमय दिनी नटाराजाच्या पावन साक्षीने या नाटकाच्या तालमीचा भव्य शुभारंभ पार पडला. जेष्ठ पत्रकार व दै. दिव्य लोकप्रभाचे संपादक सन्मानीय संतोषजी मानूरकर तसेच ट्विंकलिंग



स्टार स्कूलचे संस्थाचालक मा. गणेश मैड यांच्या शुभहस्ते या नाट्यप्रयोगाच्या तालमीचा प्रारंभ आणि पोस्टर प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. 'आम्ही कलावंत प्रस्तुत रेंज पाहिजे' या नाटकाचे दिग्दर्शन लक्ष्मीकांत दोडके यांच्याकडे असून या नाटकाचे लेखन सौ. सोनलताई नहार यांनी केले आहे. सहाय्यक दिग्दर्शक म्हणून रोहित पुराणिक आपले योगदान देणार आहेत. दरम्यान उदघाटक संतोष मानूरकर व गणेश मैड यांनी संपूर्ण नाट्यसंघाला मनः पूर्वक शुभेच्छा देत कलाकारांचे मनोबल उंचावले. या नाटकात बीडमधील तब्बल ७० कलाकार सहभागी होतायत हेच या नाटकाचे खरे सामर्थ्य ठरणार असून या नाट्यप्रयोगाच्या माध्यमातून बीडची रंगभूमी पुन्हा नवचैतन्याने फुलणार असल्याची भावना व्यक्त केली. याप्रसंगी रेंज पाहिजे या नाटकातील सहभागी कलाकार तसेच पालक उपस्थित होते. नवोदित कलाकारांना एकत्र आणून त्यांना व्यासपीठ देण्याच्या हेतूने या नाटकाची निर्मिती होत आहे व कालपासूनच या नाटकाची तालीम सुरु झाली आहे. येत्या ऑगस्ट महिन्यात 'रेंज पाहिजे' या नाटकाचा भव्य रंगमंचीय सादरीकरण प्रयोग रसिक प्रेक्षकांसमोर सादर होणार आहे, अशी माहिती या नाटकाचे निर्मिती सूत्रधार प्रतिक कांबळे यांनी दिली आहे.

## गुरूंच्या चरणी कृतज्ञतेची वंदना: माईलस्टोन स्कूलमध्ये गुरू पौर्णिमा उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील छत्रपती कॉलनीतील माईलस्टोन प्री स्कूल व माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल, तळेगाव , बीड मध्ये गुरू पौर्णिमा सोहळा उत्साहात आणि भक्तिभावात पार पडला. या निमित्ताने शाळेतील चिमुकल्यांनी 'गुरूवंदना' आणि 'गुरूपूजन' करत आपल्या गुरूंबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमात माता हीच पहिली गुरू या विचाराला साजेशा पद्धतीने विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून गुरूंचा महिमा उलगडला. अनेक चिमुकल्यांनी प्रभावी भाषण सादर करून उपस्थितांची मने जिंकली. उत्तम भाषण करणाऱ्या



विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसाठी आकर्षक ग्रीटिंग कार्ड्स बनवून 'गुरू' या संकल्पनेला भावनिक स्पर्श दिला. शाळेचे संचालक ज्ञानेश्वर तांबे, नम्रता तांबे, प्रिन्सिपल सारिका जगताप, समन्वयक रोहिणी गीते यांच्या मार्गदर्शनाखाली गुरू पौर्णिमा उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षिका स्नेहल जोशी, अयोध्याताई यांनी परिश्रम घेतले. गुरू पौर्णिमेचा हा कार्यक्रम केवळ परंपरेची साक्षरता नव्हे, तर मुलांमध्ये संस्कारांचे बीज रोवणारा क्षण ठरला.

## प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात लोकसंख्या दिन साजरा

**नेकनुर । प्रतिनिधी**

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनूर येथे भूगोल विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी.के. तर प्रमुख पाहुणे म्हणून भूगोल विभाग प्रमुख डॉ. जाधव जे.के. उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. इनकर व्ही.एस. यांनी केले आपल्या प्रस्ताविकेमध्ये जागतिक लोकसंख्या दिन २०२५ ची थीम भावी पिढ्यांचे सक्षमीकरण शाश्वत विकास आणि



लोकसंख्या ट्रेड या कायद्याने आम्ही तरुणांना सक्षम करू शकतो आणि लोकसंख्या वाढीच्या आव्हानावर लक्ष केंद्रित करणारे शाश्वत भविष्य घडवू शकतो सांगून वाढत्या लोकसंख्येचा भावी काळात येणाऱ्या समस्या आणि तरुणांचे सक्षमीकरण करण्याविषयी माहिती दिली. प्रमुख पाहुणे डॉ. जाधव जे.के. यांनी म्हटले की जागतिक लोकसंख्या ८१२ अब्ज झाली आहे. भारताची लोकसंख्या सुमारे एक अब्ज ३४ कोटी एवढी आहे ११ जुलै १९८७ रोजी जगात पाच अब्ज अपत्य जन्माला आले तेव्हापासून हा दिवस विश्व लोकसंख्या दिन म्हणून जगभर पाळला जातो असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. ढास डी.के. म्हणाले की वाढती लोकसंख्या जागतिकीकरणाची गंभीर समस्या बनली आहे आधुनिकीकरण, औद्योगीकरण, शहरीकरण या तीन प्रमुख कारणामुळे लोकांचे स्थलांतर होत आहे. त्यामुळे शहरांमध्ये जशा वाढत्या लोकसंख्येची समस्या निर्माण झाली आहे.


## बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरूपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

स्फुर्ती शिक्षण संस्था जांब संचलित बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दि.१० जुलै गुरूवार रोजी विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक श्री खाडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली गुरूपौर्णिमा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक श्री खाडे सर व प्रमुख पाहूणे श्री जामकर सर व प्रमुख अतिथी भांगे सर यांच्या शुभ हस्ते ऐश्वर्य संपन्न भगवान बाबा यांच्या प्रतिमाचे पूजन संपन्न झाले.विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक श्री.खाडे सर व प्रमुख पाहुणे श्री जामकर सर व प्रमुख अतिथी भांगे सर व सर्व शिक्षक वृदांचे स्वागत विद्यार्थ्यांनी केले या प्रसंगी सुरज सातपुते,योगिता तांबारे,गायत्री नागरगोजे,रागिणी सातपुते,समाधान सातपुते,आरती वाघमारे,सिमरन शेख,अक्षरा सातपुते,प्रतिक्षा खोपडे,रियाज शेख,ओमकार बांगर,जोया पठाण,मोहिनी सोनसाळे अशा अनेक विद्यार्थ्यांनी गुरूपौणिमे निमित्त सर्व शिक्षक बांधवाना व विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करून गुरू पौणिमेच्या शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी श्री जायभाये सर यांनी मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांनी गुरूंचा व आई वडिलांचा आदर राखावा असा संदेश दिला.कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक श्री खाडे सर यांनी आपल्या भाषणात गुरूंचा आदर व गुरूंचे महत्व या संबंधी सर्वांना सखोल असे मार्गदर्शन केले सर्वांना गुरूपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या या प्रसंगी विद्यालयाचे सहशिक्षक मिसाळ सर,मोराळे मॅडम,जामकर सर,मोरे सर,जायभाये सर,कराड भांगे सर,खेडकर सर,प्रा.सोनवणे प्रा.ढास प्रा .मस्के सर्व विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन मोरे सर यांनी केले




## श्री दत्त संस्थान बालाघाट येथे गुरु पौर्णिमा उत्सव व गुरू पूजन सोहळा साजरा



**बीड । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र कपिलधार पासून जवळच असलेल्या श्री.दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने व दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी बालाघाट डोंगर परिसरात श्री दत्त संस्थान कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे गुरुवार दि. १० /०७/ २०२५ रोजी गुरु पौर्णिमा उत्सव व गुरू पूजन सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. गुरु पौर्णिमा उत्सव व गुरू पूजन दत्त उपासक शिंदे महाराज यांनी केले. दुपारी श्री दत्त महाराज व भोले शिवशंकर यांना दुग्ध अभिषेक करून गुरूची पाद्य पूजा केली. रात्री शिवाजी नगर उदंड वडगाव येथील भजनी मंडळाचा संगीत भजनाचा कार्यक्रम झाला.

# आखिल भारतीय विद्यार्थी परिषद बीड शाखेकडून राष्ट्रीय विद्यार्थी दिन व गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**• गुरुपौर्णिमा आणि राष्ट्रीय विद्यार्थी दिन... सस्कारांचा संगम!**

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, बीड शाखेच्या वतीने ९ जुलै राष्ट्रीय विद्यार्थी दिन आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा ७७ वा. स्थापना दिन मोठ्या बीड जिल्हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शहरातील विविध महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना शुभेच्छा कार्ड देऊन राष्ट्रीय विद्यार्थी दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.तसेच शासकीय ITI महाविद्यालयात कौशल्य



विकासातील संधी व उद्योजकता विकास या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानाचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. रमेश खंडागळे होते.यांनी सांगितले की आज चा विद्यार्थी हा कौशल्य पूर्ण असावा व तो नोकरी च्या मागे न पळता उद्योजक बनण्याच्या पर्यंत करणारा असावा. असे सांगत उद्योजकता विषयाचे महत्व व येणाऱ्या संधी सांगितल्या. अभाविप स्थापना दिन आणि राष्ट्रीय विद्यार्थी दिनानिमित्त बंकट स्वामी महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमात प्राचार्य शंकर धांडे व अभाविप स्थायी कार्यकर्ते चंद्रकांत फड यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. या वेळीय अभाविप प्रांत SFD प्रमुख प्रा. डॉ. अरुण पाटील, शहराध्यक्ष प्रा. डॉ. जगन्नाथ चव्हाण, शहर सहमंत्री आशिष वारे, राघवेंद्र कुलकर्णी, प्रद्युमन परजणे आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच बीड शहरातील विविध महाविद्यालयात जाऊन प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकवृंदांना भेटून गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा देण्यात आल्या. शहर सहमंत्री आशिष वारे, राघवेंद्र कुलकर्णी, प्रद्युमन परजणे, आशुतोष रणखांबे, ऋषिकेश लाखे, सार्थक कडु व इतर कार्यकर्ते सहभागी झाले होते. अभाविप बीड शाखेकडून घेतलेल्या या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थी आणि शिक्षकवर्गात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून भविष्यात असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील.

दैनिक मराठवाडा पत्र — दि. १२/०७/२०२५

**टी सी व इतर कागदपत्रे हरवले आहेत.**

प्रथमेश प्रसाद देशमुख यांचा दहावी पास चा टीसी व मार्क मेमो व इतर कागदपत्रे बीड चौसाळा प्रवास करताना एसटीमध्ये हरवले आहेत कोणाला सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा.

**संपर्क : ७७४५०६०९९८**

CMYK

दैनिक

● https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

रविवार, दि.१३ जुलै २०२५ 

## स्थानिक स्वराज्य निवडणुका संदर्भात आम आदमी पार्टीच्या मराठवाडा पदाधिकाऱ्यांची बैठक

बीड । प्रतिनिधी



बीड महाराष्ट्र मध्ये होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी उद्या दिनांक १३/०७/२०२५ रोजी मराठवाड्यातील पदाधिकारी मराठवाडा तील सर्व जिल्ह्याचे जिल्हा अध्यक्ष जिल्ह्यातील पदाधिकारी यांची बैठक शासकीय विश्रामगृह बीड येथे सकाळी ११ वाजता ठेवण्यात आलेलीतरी मराठवाडा विभागातील सर्व पदाधिकारी जिल्हा अध्यक्ष यांनी या बैठकीला उपस्थित राहणे अनिवार्य आहे कारण महाराष्ट्रामध्ये पुढील येणाऱ्या स्थानिक स्वराज्य निवडणुका विषयी मराठवाड्याचे सचिव संग्राम जी गाडगे पाटील व मराठवाड्याचे ▶▶ उर्वरित पान २ वर

# लाईनस्टाफ संघटनेच्या शिष्टमंडळाने जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्केंची घेतली भेट

### महावितरण वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लाईनस्टाफवर अन्याय करू नये

बीड । प्रतिनिधी

बीड महावितरण वरिष्ठ अधिकाऱ्यां कडून लाईनस्टाफ कर्मचाऱ्यांना जाणीवपूर्वक त्रास दिला जात असून, त्यांच्या अडचणी व मागण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून त्यांची हेळसांड केली जात आहे. अशी तक्रार क्रांतिकारी लाईनस्टाफ सेनेच्या शिष्टमंडळाने आज राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या कडे लेखी निवेदना द्वारे केली आहे.

महावितरण बीड विभागीय कार्यालय अंतर्गत महिला तंत्रज्ञ कर्मचारी सौ. अस्मिता प्रकाश रायमल व त्यांचे पती प्रकाश रायमल कार्यरत आहेत. वरिष्ठ



अधिकाऱ्यांची पती प्रकाश रायमल यांच्याशी चालू असलेल्या कुरबुरी मुळे पत्नी सौ. अस्मिता रायमल यांची अन्यकारक बदली केल्याने लाईनस्टाफ कर्मचाऱ्यांनी नाराज व्यक्त करून सदरील बदली रद्द करण्याची विनंती केली आहे. नैराश्याच्यातुन सदरील महिला कर्मचारी यांनी ११ जुलैच्या सायंकाळी साडेपाचच्या सुमारास पती मुलांना सोडून निघून गेल्या आहेत. माझे काही बरे वाईट झाले तर यास सर्वस्वी जबाबदारी

बदली प्रस्ताव पाठवणाऱ्या अभियंत्याची असेल, असा मेसेज टाकला आहे. ११ जुलै रोजी रात्री ग्रामीण पोलीस स्टेशनला या प्रकरणाची माहिती दिली आहे.प्रकाराचे गांभीर्याने चिंतीत होवून क्रांतिकारी लाईन स्टाफ सेनेचे पदाधिकारी व सभासद यांनी भेट घेतली शेख अमीर मदनी,गजानन साळुंके, अश्वलींग बरे, गोकुळ गायकवाड, रजनीकांत तागड, गणेश कागदे,प्रवीण शिंदे, दत्ता माटे,रवी देशमुख,युवराज जोगदंड,लहु वाघमारे,सुनिल लांडगे, राम दास गायके यांच्या नेतृत्वात लाईनस्टाफ कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली.

कार्यकारी अभियंता श्री डोंगरे यांच्याशी राजेंद्र मस्के यांनी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली.कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन काम करावे. आकसा पोटी कोणावरही अन्याय करु नका. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसी चर्चा करून मार्ग काढावा अशी सूचना केली आहे.

## परळी शहरातील संवेदनशील भागात सीसीटीव्ही व रात्रीची पेट्रोलिंग चालू करा



परळी । प्रतिनिधी

परळी शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये चोऱ्या व भुरट्या चोऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. या चिंताजनक परिस्थितीकडे पोलिसांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे लक्षात येत आहे, ज्या मुळे स्थानिक नागरिकांमध्ये भिती व अस्वस्थता पसरली आहे. या भागातील ५० लोकांचे शिष्टमंडळाने शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नाचन यांची भेट घेऊन निवेदन दिले.

गणेशपार जुन्या गाव भागापासून नवीन मोहदिया कॉलनीपर्यंत, सावता माळी परिसर, उखळवेस परिसर, तानाजी चौक, साठे नगर परिसर, भीमनगर, श्री कालरात्री देवी मंदिर परिसर, जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगर, नवीन वस्तीपासून बटू भैरव मंदिरापर्यंत अनेक ठिकाणी भीषण चोरीच्या घटना घडत आहेत. यामुळे स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेला थोका निर्माण झाला आहे. संवेदनशील भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, पोलिसांची गस्त वाढवणे आणि विशेषत: पोलिस पेट्रोलींगचा वापर करणे आवश्यक आहे. याप्रसंगी निवेदन देताना या भागातील बहुसंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी हनुमान नगर मधील रस्त्याची कामे करुन नागरिकांचा सोडविला मोठा प्रश्न

### कित्येक दिवसांपासून रखडलेल्या रस्ताचे काम प्रश्न अखेर मार्गी

बीड । प्रतिनिधी

गेली अनेक वर्षे दुरावस्थेत असलेला आणि नागरिकांच्या समस्येचे मूळ ठरलेला पेठ बीड येथील हनुमान नगर येथील रस्ता अखेर नगरसेवक अमर नाईकवाडे यांच्या प्रयत्नांमुळे पूर्ण करण्यात आला आहे. सदरील रस्त्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार, तत्कालीन पालकमंत्री धनंजय मुंडे, माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्याकडे लेखी मागणी करुन नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी पाठपुरावा केला होता.



शहरातील हनुमान नगर येथील नागरिकांच्या दळणवळणाच्या सोयींसाठी मुख्य असलेला रस्ता हा अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. सदरील रस्त्याची अवस्था इतकी वाईट होती की पावसात तिथे पाणी साचायचे, पादचार्यांना चालणेही कठीण व्हायचे. नगरसेवक अमर नाईकवाडे यांना स्थानिक रहिवाशांनी रस्त्याची म ागणी केल्यानंतर त्यांनी त्यावेळचे पालकमंत्री धनंजय मुंडे असतांना त्यांच्याकडे तसेच उपमुख्यमंत्री

▶▶ उर्वरित पान २ वर

## धार्मिक स्थळी सार्वजनिक स्वच्छालय उभारा: ग्रा.पं.सदस्य सतीष सोनवणे

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील कवडगाव हे पंचायत समिती सर्कलचे गाव असून या गावची लोकसंख्या म ोठ्या प्रमाणात आहे. येथील नवीन गावठाणा येथे हनुमान मंदिर आहे.

या मंदिरामध्ये गणपती उत्सव, सप्ताह,किर्तनासह आदी धार्मिक कार्यक्रम केले जातात या कार्यक्रमास भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणामध्ये असते या ठिकाणी आलेल्या भाविकांना शौचालयाची सोय नसल्यामुळे खूप मोठी गैरसोय येथील



भाविक भक्तांची होत आहे. या मंदिरात तात्काळ सार्वजनिक स्वच्छालयास मंजुरी मिळावी अशी मागणी कवडगाव येथील ग्रामपंचायत सदस्य सतीष सोनवणे यांनी वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. अश्या धार्मिक स्थळी तात्काळ सार्वजनिक स्वच्छालय उभारून भाविक भक्तांची गैरसोय टाळावी यासाठी प्रशासनाने प्रयत्न करून वारकरी मंडळींचा प्रश्न सोडवावा अशीच मागणी वारकरी मंडळी कडून देखील होत आहे.या मागणीची तात्काळ दखल नाही घेतल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करू असा इशाराच निवेदनाद्वारे ग्रामपंचायत सदस्य सतीष सोनवणे यांनी दिला आहे.

## ज्येष्ठ नेते डॉ.बाबुरावजी जोगदंड यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम राबवून साजरा

बीड । प्रतिनिधी

बालाघाट आणि बीड जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते डॉ.बाबुरावजी जोगदंड यांचा वाढदिवस अनेक सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला.

डॉ. बाबुराव जोगदंड यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील अनेक सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्यात आला. या वाढदिवसानिमित्त जिव्हाळा अनाथ आश्रम भाजी मंडई बीड या ठिकाणी कार्यकर्त्यांकडून व्यर्थ खर्चाला बाजूला सारत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन



करण्यात आले होते. यामध्ये शेकडो कार्यकर्त्यांनी रक्तदान देत वाढदिवस साजरा केला तसेच सायंकाळी जिव्हाळा बेघर निवारा केंद्र या ठिकाणी अनाथ लोकांसाठी अन्नदान करून वाढदिवस साजरा करण्यात आला. डॉ.जोगदंड हे सातत्याने सामाजिक कार्यात असून गोर गरीब लोकांना कायमच मदतीचा हात देत असतात. त्यांच्या याच

▶▶ उर्वरित पान २ वर

## आ. सुरेश धस यांनी घेतली शेळके कुटूंबीयांची भेट

आष्टी । प्रतिनिधी

अहिल्यानगर-पुणे महाम ार्गावर जातेगाव फाटा शिवारात आमदार सुरेश धस यांच्या मुलाच्या कारची धडक बसून,दुचाकीवरील हॉटेल व्यावसायिकाचा मृत्यू झाला.त्यानंतर या अपघाताचे सोशल मिडियावर विरोधकांनी भांडवल करत आगडोंब उठविला होता.हा अपघात आहे त्यावर पोलिस सविस्तर तपास करतील असे सांगत शुक्रवार (दि.११) रोजी सायंकाळी विधानसभेचे अधिवेशन आटोपून आष्टीकडे येताना आमदार सुरेश धस हे मयत नितीन शेळके यांच्या घरी जाऊन भेट झालेल्या दुर्दैव घटनेबद्दल खंत



व्यक्त करत कुटुंबियांना धीर दिला. सोमवारी (७ जुलै) रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास हा अपघात झाला.नितीन प्रकाश शेळके (३४,रा.पळवे खुर्द, ता.पारनेर) असे मृत दुचाकीस्वाराचे नाव होते.अपघात झाल्यानंतर आमदार सुरेश धस यांचे पुत्र स्वतः सागर धस हे जखमीला दवाखान्यात घेऊन गेले व उपचार करण्यास सांगितले परंतु दुर्दैवाने नितीन यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला.या दुर्दैवी घटनेचा सोशल मिडीयावर विरोधकांनी ट्रोल करत आरोपांची लाखोळी केली.यानंतर स्वतः आमदार सुरेश धस यांनी मि डीयासमोर येऊन या अपघाताची संपुर्ण चौकशी करा, माझ्या मुलांच्या रक्ताचे नमुनेही

▶▶ उर्वरित पान २ वर

## शेतकऱ्याच्या शेतातून केली चंदनाची चोरी

परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील औरंगपूर शिवारात एका शेतकऱ्याच्या शेतात लावलेल्या चंदनाच्या झाडाची चोरट्यांनी चोरी केल्याची घटना समोर आली आहे. ही घटना ९ जुलै रोजी रात्री उशिरा घडली असून, शेतकऱ्याने याबाबत सिरसाळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

शेतकरी हनुमंत नामदेव नागरगोजे वय ५० वर्षे व्यवसाय शेती रा.औरंगपुर ता.परळी यांनी त्यांच्या शेतात चंदनाची काही झाडे लावली होती. ९ जुलै रोजी रात्री ८ वाजता अशोक साहेबराव भोसले वय ५० वर्षे रा. खामगाव ता. परळी, सुरज परमेश्वर काळे वय २० वर्षे रा. टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापुर, पप्पू जाधव रा. परळी या आरोपींनी संगणमत करुन विनापरवाना बेकायदेशिररित्या स्वतच्या आर्थीक फायद्यासाठी शेतातील एकुन सहा चंदनाची झाडे एका झाडाची किंमत २०, ००० या प्रमाणे एकूण १,२०,००० रुपयाचे चंदनाचे झाड तोडुन त्यातील गाभा व झाड आरोपींनी चोरून नेले. आणि ८ चंदनाचे झाडाला काप मारुन नुकसान केले. असा एकूण १,२०,००० रुपयांचा मुद्देमाल चोरून केला. याप्रकरणी सिरसाळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

# खरीप हंगामातील पिके पावसा अभावी धोक्यात : मनोज शेंबडे

खळेगाव । प्रतिनिधी

खळेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते मनोज शेंबडे यांनी खळेगाव शेत शिवारात पीक पाणी केली असता कापूस तूर मूग सोयाबीन खरीपाची आदी पिके पूर्णतः धोक्यात असून काही शेतकऱ्यांनी दुबार पेरणी करून देखील पिके पावसाळावी कोम जली आहेत तरी काही ठिकाणी ऊगलच नाही तर काही ठिकाणी लागवडी क्षेत्रा पैकी ५०टक्के पिकें उगवली यामुळे दुबार पेरणीसाठी



सरकारने तात्काळ शेतकऱ्यांना. आर्थिक मदत करुन बळीराजाला जीवदान द्यावे शेंबडे यांनी असे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. पावसाळ्याला एक महिना होऊन गेलासविस्तर वृत्तांत आसाकी खळेगाव धुमेगाव शेत शिवार पाहणी करत असताना शेतकरी हा पूर्ण संकटात सापडला असून खरीप हंगामातील शेतकऱ्यांनी केलेले पेरणी पावसाळ्याच्या अभावी कापूस सोयाबीन मुग कापूस तूर बाजरी खरीप हंगामातील ९० टक्के पेरणी केलेले असुन शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे एक महिना झाला तरी मोठा पाऊस झाला नाही.सोयाबिन, कांदा, तुर, मुग, भुईमुग, कापूस पिकाचे पेरा होऊन देखील ७०%पिके कोमजली असुन एकंदरीत

▶▶ उर्वरित पान २ वर

## आषाढी यात्रा साजरी करून पिंपळनेरचे भाविक गावी परतले

पिंपळनेर । प्रतिनिधी

जातो माघारी पंढरीनाथा । तुझे दर्शन झाले आता अशी आर्त हाक देत भाविकांनी आषाढी यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा साजरा करून एस.टी. बस, व खासगी ट्रक, टेम्पो, ट्रॅक्टर-ट्रॉली, जीप गाड्यांचा आधार घेत पिंपळनेरसह परिसरातील भावी भे गावी परतले. मात्र मानाच्या पालख्या पौर्णिमेपयरत पंढरीत मुकामी असुन गोपाळकाला पूर्ण करून पालख्यांचा परतीचा प्रवास सुरू झाला . काही भाविकांनी एकादशी साजरी करून सोमवारी द्वादशीला परतीचा प्रवास सुरू केला होता. बहुतांश भाविक स्वत... च्या वाहनाने, तसेच एस.टी. बसेस व टेम्पो ने प्रवास करीत असल्याचे चित्र दिसून आले. एस.टी. बसला महिलांना ५० टक्के प्रवासात सवलत योजना असल्याने महिलांची गर्दी जास्त दिसून आली.

